# दिवा न्यूज

दिशादर्शक, मार्गदर्शक!

▶ वर्ष–३

■ अंक–६

■ epaper.diwanews.com ■ सोमवार, ११ सप्टेंबर २०२३ ■ पाने–८ ■ किंमत ४ रु. ■ RNI No.-MAHMAR/2021/80669 ■ www.diwanews.com


रिक्षाचालकांच्या मनमानी थांब्यामुळे दिवा टर्निंग येथे सायंकाळच्या वेळेस

**होतेय वाहतूक कोंडी!**

(संबंधित वृत्त पान ३ वर)

# ठाणे महापालिका स्थावर मालमत्ता विभागाच्या भोंगळ कामकाजावर आ. केळकर यांचा हल्लाबोल!

**रस्ता रुंदीकरणात जागा गेलेले, घरे गेलेले बरेच वंचित आहेत, ज्यांना अनेक वर्ष उलटली तरी अद्याप जागा व घरे दिलेली नाही**

## कित्येकांना तर साधे पत्रही दिलेले नाही...

## स्थावर मालमत्ता विभागाची श्वेतपत्रिका काढा



## आ. संजय केळकर यांची ठामपा आयुक्तांकडे मागणी

ठाणे: बोगस लाभार्थींना घरे देणे असो अथवा अनेक मालमत्तांची हेराफेरी करण्याचे प्रकार असोत. ठाणे महापालिकेच्या स्थावर मालमत्ता विभागात अनियमितता असुन अक्षरश: बजबजपुरी बोकाळली आहे. तेव्हा, हा संपुर्ण लेखाजोखा समोर येण्यासाठी स्थावर मालमत्ता विभागाची श्वेतपत्रिका काढा. अशी आग्रही मागणी ठाणे शहर मतदारसंघाचे आमदार संजय केळकर यांनी ठामपा आयुक्त अभिजीत बांगर यांच्याकडे केली आहे.

रस्ता रुंदीकरणात जागा गेलेले, घरे गेलेले बरेच वंचित आहेत, ज्यांना अनेक वर्ष उलटली तरी अद्याप जागा व घरे दिलेली नाही. कित्येकांना तर साधे पत्रही दिलेले नाही. कुठल्याही मालमत्तांचा हिशोब लागत नाही. नागरीक वर्षानुवर्ष खेटा मारतात तरीही त्यांना न्याय मिळालेला नाही. बोगस लाभार्थी दाखवुन पुर्नवसनाच्या नावाखाली जागा बहाल केल्या आहेत. इतकी अनियमितता असुन स्थावर मालमत्ता विभागात अक्षरशः बजबजपुरी बोकाळली आहे. याकडे आ. केळकर यांनी आयुक्तांचे लक्ष वेधून याचा संपुर्ण लेखाजोखा समोर येण्यासाठी स्थावर मालमत्ता विभागाची श्वेतपत्रिका काढावी. अशी मागणी केली आहे. त्यानुसार आयुक्तांनीही याबाबत सकारात्मक भूमिका घेतली असल्याचे आ. केळकर यांनी सांगितले.

**ठाणे महापालिकेचा स्थावर मालमत्ता विभाग येनकेन प्रकारे नेहमीच संशयाच्या भोवऱ्यात असतो. स्थावर मालमत्ता विभागाकडुन टोलवाटोलवी होत असल्याचा आरोप दिव्यांग बांधव तसेच अनेक लाभार्थ्यांनीही केला होता. मध्यंतरी अनेक आरोप झाल्याने महापालिकेतील वादग्रस्त अधिकारी महेश आहेर यांच्याकडे असलेल्या या विभागाच्या कार्यालयीन अधीक्षक पदाचा पदभार अन्य अधिकाऱ्याकडे सोपवण्यात आला. तरीही कारभारात सुधारणा होत नसल्याने आ.संजय केळकर यांनी शनिवारी आयुक्त अभिजीत बांगर यांची भेट घेऊन चर्चा केली.**

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. ११ सप्टेंबर २०२३ | पान : २
www.diwanews.com

## ठाण्यात जखमी गोविंदांची संख्या पोहोचली २३ वर

**ठाणे:** शहरात रात्री उशिरापर्यंत दहीकाला उत्सवात एकूण २३ गोविंदा जखमी झाले. यामध्ये १३,१६,१७ आणि १८ या वयोगटातील पाच गोविंदा असून उर्वरित गोविंदा हे २० वर्षांवरील आहेत. तसेच जखमी गोविंदांमध्ये १३ ठाणेकर, ६ मुंबईतील, विरारचे २ आणि नवीमुंबई व कल्याण येथील प्रत्येकी १-१ गोविंदाचा समावेश आहे. यामध्ये एका महिला गोविंदाचाही समावेश आहे. गोविंदांना किरकोळ दुखापत झाल्याने उपचार करून घरी सोडण्यात आले आहे.

## बारवी धरणग्रस्तांपैकी आणखी १८ तरुण नोकरीसाठी पात्र

**ठाणे :** बारवी धरण प्रकल्पात जमीन गेल्यानंतर बाधित झालेल्या शेतकऱ्यांच्या १८ कुटुंबातील तरुण सरकारी नोकरी मिळविण्यासाठी पात्र ठरले आहेत. केंद्रीय पंचायती राज राज्यमंत्री कपिल पाटील यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात सोमवारी घेतलेल्या बैठकीत तातडीने तांत्रिक अडचणी दूर करून १८ तरुणांना पात्र ठरविण्याचे निर्देश दिले. या निर्णयामुळे अनेक वर्षांपासूनच्या प्रतिक्षेतील तरुणांना दिलासा मिळाला आहे.

बारवी धरण ते मुरबाड पाईपलाईन रस्त्याबरोबरच देवपे, पशेणी आणि देवगाव येथील बाधित शेतकऱ्यांच्या प्रश्नांसंदर्भात केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष बैठक घेतली. या बैठकीला जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, एमआयडीसीचे वरिष्ठ अधिकारी, भाजपाचे जिल्हाध्यक्ष मधुकर मोहपे यांच्यासह स्थानिक लोकप्रतिनिधी व काही शेतकऱ्यांची उपस्थिती होती. केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांनी बारवी धरण प्रकल्पग्रस्तांचे अनेक प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घेतला आहे. त्यानुसार देवपे, पशेणी आणि देवगावमधील धरणग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी बैठक झाली. धरणग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबातील १८ तरुण नोकरीसाठी अपात्र ठरले होते. या १८ तरुणांना पात्र ठरविण्याबाबत तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश श्री. पाटील यांनी दिले. त्याचबरोबर देवपे गावातील शेतकऱ्यांना प्रकल्पग्रस्तांचा दाखला देण्याबाबतही कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले.

## ठाणे शहरातील पनीर उत्पादकांवर अन्न व औषध प्रशासनाची कारवाई

### ४ लाखांहून अधिक किंमतीचे पनीर, दूध व इतर साहित्य जप्त

**ठाणे :** जिल्ह्यातील दूध भेसळ रोखण्यासाठी जिल्हास्तरीय समितीच्या मार्फत जिल्हा अन्न व औषध प्रशासन विभागाने वागळे इस्टेट भागातील दोन दूध डेअरींची अचानक तपासणी केली. अस्वच्छ वातावरणात पनीर तयार करत असल्याचे यावेळी आढळून आले. या कारवाईत सुमारे ४ लाख १ हजार ३७४ रुपये किंमतीचे पनीर, दूध व इतर साहित्य जप्त करण्यात आले असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासनचे सहआयुक्त सुरेश देशमुख यांनी दिली आहे.

ठाणे जिल्ह्यामधील दूध व दुग्धजन्य पदार्थांची भेसळ रोखण्यासाठी अपर जिल्हाधिकारी मनिषा जायभाये-धुळे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे. या समिती अंतर्गत कोकण विभागाचे सह आयुक्त (अन्न) सुरेश स. देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न व औषध प्रशासन ठाणे विभागाने ठाणे परिसरातील वागळे इस्टेट मधील मे. केवला डेअरी या उत्पादक पेढीची अचानक तपासणी केली असता या ठिकाणी अस्वच्छ वातावरणात पनीरचे उत्पादन होत असल्याचे आढळून आहे. या ठिकाणी पनीर तयार करण्यासाठी वापरण्यात येणारे म्हशीचे दूध आणि पनीर या अन्न पदार्थाचे नमुने तपासणीसाठी घेऊन म्हशीचे ५९८ लिटर दूध व ७९ किलो पनीर असा एकूण ४५ हजार ३१६ रुपये किंमतीचा साठा जप्त करण्यात आला आहे.

वागळे इस्टेट, राम नगर येथील मे. यादव मिल्क प्रोडक्ट्स या ठिकाणी अन्न व औषध प्रशासनच्या पथकाने अचानक तपासणी केली असता या पेढीत पनीर आणि पनीर ॲनलॉग तयार करीत असल्याचे आढळले. हे उत्पादन अत्यंत अस्वच्छ वातावरणात विनापरवाना करीत असल्याने या ठिकाणी स्वच्छता करून परवाना घेईपर्यंत पेढी बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या ठिकाणी पनीर, पनीर ॲनलॉग, स्कीमड मिल्क, सायट्रिक ॲसिड, मोनोसोडियम ग्लोटेण, रिफाईन्ड पामोलीन ऑईलचे नमुने घेण्यात आले. यावेळी सुमारे ३ लाख ५६ हजार ५८ रुपये किंमतीचे पनीर, पनीर अॅनलॉग, दूध, रिफाईंड पामोलिव्ह ऑइल व इतर साठा जप्त करण्यात आला आहे. तसेच ३८२ किलो पनीर व पनीर अँनलॉग, २८ लिटर दूध, सायट्रिक असिड, २८९३.४ किलो रिफाईंड पामोलिव्ह ऑईल आदी साठा जप्त करण्यात आला.

सहा. आयुक्त (अन्न) व्यंकटेशया ठिकाणी आस्थापनेमध्ये अन्नपदार्थांच्या विक्रीसाठी उत्पादन करताना कोणतीही खबरदारी घेत नसल्याचे, जनहित व जन आरोग्याच्या दृष्टीकोनातून, त्रुटींची पूर्तता करीत नसल्याने तसेच अन्न सुरक्षा मानदे कायदा २००६ नियम व नियमने २०११ अंतर्गत या आस्थापनेस तपासणीवेळी आढळून आलेल्या त्रुटींची पूर्तता करेपर्यंत अन्न सुरक्षा मानके कायदा नियमन २०११ चे नियमन २.१.१४(१) अंतर्गत असलेल्या निर्देशांचे तंतोतत पालन करणे अन्न व्यवसायाच्या चालकावर बंधनकारक असून त्याचे उल्लंघन केल्यास हे उल्लंघन अन्न सुरक्षा मानदे कायदा २००६ चे कलम ५५ अंतर्गत २ लाखापर्यंतच्या द्रव्य दंडास पात्र ठरते, असे सहआयुक्त देशमुख यांनी सांगितले.

## राष्ट्रवादीच्या ठाणे व पालघर जिल्ह्याच्या समन्वयकपदी आनंद परांजपे यांची नियुक्ती



**ठाणे:** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ठाणे व पालघर जिल्हा समन्वयकपदी आनंद परांजपे यांची नियुक्ती झाली असून बुधवारी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या हस्ते परांजपे यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रवक्ते व ठाणे शहर (जिल्हा) अध्यक्षपदाची जबाबदारी परांजपे सांभाळत असतानाच त्यांच्या भरीव कामाची दखल घेऊन, पक्ष वाढीसाठी, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी आनंद परांजपे यांच्यावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ठाणे व पालघर जिल्ह्याच्या समन्वयकपदाची जबाबदारी सोपविली.

## ठाण्यात सापडली घोरपड



**ठाणे:** वागळे इस्टेट श्रीनगर,वारली पाठोपाठ मंगळवारी पडवळ नगर येथे एका घोरपडीचे पुन्हा एकदा दोन महिन्यांनी दर्शन झाले. त्या घोरपडीची सुखरूप रित्या सुटका करून तिला वनविभागाच्या ताब्यात देण्यात आले आहे. तसेच मादी जातीची घोरपड ही ४ ते ५ महिन्यांची असल्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. घोरपड सापडण्याची ही तिसरी घटना असल्याने त्या शहरी भागात का येतात याचा गांभीर्याने विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. ११ सप्टेंबर २०२३
पान : ३
www.diwanews.com

## खुनाच्या गुन्ह्यात आरोपीला जन्मठेप ठाणे न्यायालयाचा निकाल

**ठाणे:** भांडण सोडविण्यासाठी आलेल्या बापलेकांसह अन्य दोघांवर कात्रीने प्राणघातक हल्ला केला. यामध्ये समीर देवळकर यांचा मृत्यू झाला असून त्यांचे वडील मंगेश देवळकर, आकाश राऊत आणि सनी पवार या तिघांना जखमी केले होते. या खुनाच्या गुन्हयात ठाणे अतिरिक्त जिल्हा न्यायालयाचे नायधीश ए एस भागवत यांनी आरोपी आकाश दिलीप उतेकर (रा.दिवा-मुंब्रा) यास दोषी ठरवत जन्मठेपेची आणि एक हजार दंडाची शिक्षा ठोठावली आहे. तर इतर सात जणांची निर्दोष मुक्तता केली आहे.

# रिक्षाचालकांच्या मनमानी थांब्यामुळे दिवा टर्निंग येथे सायंकाळच्या वेळेस होतेय वाहतूक कोंडी!

## पालिका आणि पोलीस प्रशासन लक्ष देणार का? नागरिकांचा सवाल

**दिवा:-** दिव्यात एकीकडे फेरीवाल्यांमुळे वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत असतानाच बेशिस्त रिक्षा चालकांच्या दिवा टर्निंग येतील मनमानी थांबल्यामुळे सायंकाळच्या वेळेस या भागात ट्रॅफिक होत असल्याचे समोर येत आहे. या ठिकाणी कायमस्वरूपी वाहतूक पोलीस नियुक्त करण्यात यावा अशी मागणी नागरिकांत होत आहे.

दिवा टर्निंग हा शहरातील मुख्य नाका असून नवी मुंबई,ठाण्याच्या दिशेने येणारी वाहने याच ठिकाणी येत असतात. त्याचबरोबर नवी मुंबई ठाण्याच्या दिशेने जाणाऱ्या बसेस याच नाक्यावरून जात असतात. दिवा स्टेशन, आगासन- दिवा या भागातून येणारी वाहने ही याच नाक्यात येत असतात. असे असताना या नाक्यावर कायमस्वरूपी वाहतूक नियंत्रक उपलब्ध नसल्याने त्याचबरोबर सिग्नल व्यवस्था नसल्याने सायंकाळच्या वेळेस मनमानी पद्धतीने रिक्षा चालक दिवा टर्निंग बस स्टॉप च्या बाजूलाच रिक्षा लावून उभे असतात. यामुळे एक लेन जॅम होऊन पूर्ण नाक्यामध्ये ट्रॅफिक होत असते.याबाबत शहरातील नागरिकांनी वारंवार मागणी करूनही येथील वाहतूक समस्येवर कायमचा तोडगा काढण्यात पालिका प्रशासन व वाहतूक पोलीस विभागांना अपयश आले आहे. या भागात कायमस्वरूपी वाहतूक नियंत्रणासाठी वाहतूक पोलीस उपलब्ध करावा अशी मागणी आता नागरिकांमधून होत आहे. त्याचबरोबर बेकायदा पद्धतीने या भागात थांबा घेणाऱ्या रिक्षाचालकांवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी ही मागणी नागरिकांनी केली आहे.बस मधून आलेल्या प्रवाशांना रिक्षामध्ये बसवण्यासाठी व सीट भरण्यासाठी अनेक रिक्षा चालक येथे बेकायदा पद्धतीने रिक्षा थांबवत असल्याने वाहतूक कोंडी होते असे नागरिकांचे म्हणणे आहे.याबाबत पालिका प्रशासन व वाहतूक पोलीस काय कारवाई करणार याकडे नागरिकांचे लक्ष आहे.

## दातिवलीत पथदिव्यांचे लोकार्पण

**दिवा-आगासन मुख्य रस्ता ते दातीवली स्टेशन पर्यंत लावण्यात आलेल्या पथदिव्यांचे उदघाटन मा.उपमहापौर व दिवा शहर प्रमुख रमाकांत मढवी यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या प्रसंगी शिवसेना पदाधिकारी व विभागातील नागरिक उपस्थित होते.**










**तन्वी फाऊंडेशनच्या अध्यक्षा व भारतीय जनता पार्टी दिवा शहर महिला अध्यक्ष ज्योती पाटील यांच्या वतीने दिवा शहरातील साबेगाव महिला बचत गट मधील महिलांना वज्रेश्वरी दर्शन सोहळा आयोजित करण्यात आला होता. या देवदर्शन सोहळ्याबद्दल सहभागी झालेल्या महिलांनी समाधान व्यक्त करत ज्योती पाटील यांचे आभार मानले.**

## दिव्यात मृत लहान मुलांच्या दफनविधीसाठी दफनभूमी उपलब्ध करून द्या

### भाजपच्या ज्योती पाटील यांची मागणी

दिवा:- दिवा शहरात मृत लहान मुलांच्या दफन विधीसाठी दफनभूमी नसल्याने नागरिकांची गैरसोय होते.पालिकेने ही गंभीर समस्या लक्षात घेऊन दिवा शहरात मृत्यू लहान मुलांच्या दफन विधीसाठी जागा उपलब्ध करून द्यावी अशी मागणी भाजपच्या दिवा मंडळ महिला अध्यक्षा ज्योती पाटील यांनी पालिका आयुक्तांकडे केली आहे.

दिवा शहरात लोकसंख्या वाढली मात्र शहरातील नागरिकांना सोयी सुविधा देण्यात मात्र महापालिका अपयशी ठरत आहे. शहराची लोकसंख्या साधारण पाच लाखांच्या घरात आहे.मात्र शहरात पूर्वीच्याच स्मशानभूमी उपलब्ध आहेत. नव्याने स्मशानभूमी शहरात बांधण्यात आलेली नाही. दुसरीकडे मृत लहान मुलांचा दफन विधी करण्यासाठी दिवा शहरात दफनभूमी उपलब्ध नाही. यामुळे संबंधित पालकांची दुःखाच्या प्रसंगी प्रचंड धावपळ व गैरसोय होते. अनेक पालकांना त्यांच्या मृत बालकाला दफनासाठी अन्य ठिकाणी घेऊन जावे लागते. नागरिकांची ही गैरसोय टाळण्यासाठी दिवा शहरात मूर्त लहान मुलांच्या दफन विधीसाठी जागा उपलब्ध करून द्यावी अशी मागणी ज्योती पाटील यांनी पालिका आयुक्तांकडे केली आहे.दिवा शहरात खाडीकिनारी मोकळे असणाऱ्या शासकीय जागा मधून यासाठी एखादी जागा निश्चित करण्यात यावी असेही ज्योती पाटील यांनी म्हटले आहे.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
सोमवार, दि. ११ सप्टेंबर २०२३

www.diwanews.com

## जुदो स्पर्धेत ठाण्याला पाच पदक

**ठाणे:** नाशिकच्या यशवंत व्यायाम शाळा येथे पार पडलेल्या ट्राय डिस्ट्रिक्ट जुदो स्पर्धेत ठाण्यातील जुदोपटू अस्मी मुरुडकर आणि जान्हवी कुलकर्णी यांनी रौप्यपदक तर भव्य खरात, एंजल गिरी आणि श्लोक सरोदे यांनी कांस्यपदके आपल्या नावावर केली. या स्पर्धेत मुंबई, ठाणे, नाशिक व पुणे येथील सुमारे पाचशे स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. ठाण्याच्या सरस्वती क्रीडा संकुलातील खेळाडूंनी पाच पदके पटकावली. हे खेळाडू जुदोचा सराव नौपाडा येथील सरस्वती क्रीडा संकुल येथे प्रशिक्षक देवीसिंग राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली करीत आहेत.

# गणेशोत्सव काळात रस्ते खड्डेमुक्त आणि फेरीवालामुक्त ठेवा

## आयुक्त बांगर यांचे निर्देश

**ठाणे :** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील सर्व रस्ते व विभाग कचरा, डेब्रीज, खड्डेमुक्त व फेरीवाला मुक्त राहतील या दृष्टीने सर्व सहाय्यक आयुक्त व कार्यकारी अभियंता यांनी प्रभागसमितीनिहाय प्रत्यक्ष पाहणी करुन संपूर्ण उत्सव काळात सतर्क रहावे असे निर्देश महापालिका आयुक्त यांनी अभिजीत बांगर यांनी नुकत्याच झालेल्या बैठकीत दिले. उत्सवाच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण शहर स्वच्छ व नीटनेटके राहील या दृष्टीने नियोजन करुन कार्यवाही करावी असेही त्यांनी नमूद केले.

गणेशोत्सव दहा दिवसांवर आलेला आहे. संपूर्ण गणेशोत्सव काळामध्ये शहरातील सर्व रस्ते खड्डेमुक्त, कचरामुक्त, डेब्रीजमुक्त व फेरीवाला मुक्त असतील याची विशेष दक्षता घ्यावी. गणेशमूर्ती आगमन व विसर्जन मिरवणुक मार्ग सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी ही प्रत्येक सहायक आयुक्त व कार्यकारी अभियंता यांची आहे. ज्या ठिकाणी आवश्यकता असेल तेथील रस्तेदुरूस्तीची कामे ही गणेशोत्सवापूर्वी पूर्ण करुन घ्यावी. कोणत्याही परिस्थितीत उत्सव काळात गणेशभक्तांना व नागरिकांना त्रास होणार नाही याची देखील खबरदारी घ्यावी. यासाठी कार्यकारी अभियंत्यांनी आपापल्या कार्यक्षेत्रात प्रमुख मार्गापासून ते अंतर्गत रस्त्यांना भेटी देवून आवश्यक ती कामे तातडीने पूर्ण करावीत तसेच रस्त्यावर सार्वजनिक उत्सवासाठी मंडप उभारताना रस्त्याचे नुकसान होणार नाही या दृष्टीने सर्वांनी खबरदारी घ्यावी. गणेश आगमन व विसर्जन मार्ग व अंतर्गत रस्ते पूर्णत: डेब्रीमुक्त राहतील ही जबाबदारी कार्यकारी अभियंत्यांची राहील यासाठी प्रभागसमितीनिहाय पथके गठीत करण्यात यावीत व सदर पथकांच्या माध्यमातून उत्सवपूर्व व उत्सवकालावधीत रस्त्यावर किंवा सार्वजनिक ठिकाणी पडलेले डेब्रीज उचलण्याची कार्यवाही सतत चालू ठेवावी. गणेश आगमन व विसर्जन मार्गावर फेरीवाल्यांच्या उपस्थितीमुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणावर असुविधेचा सामना करावा लागतो याबाबत गणेश मंडळांनीही त्यांच्यासमवेत झालेल्या बैठकीत नाराजी व्यक्त केली आहे. तरी कोणत्याही परिस्थितीत गणेश आगमन व विसर्जन मार्गावर फेरीवाले राहणार नाहीत याची जबाबदारी परिमंडळ उपायुक्तांची राहील असेही आयुक्तांनी नमूद केले. तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून गणेशमूर्ती आगमन व विसर्जन मार्गावर सी.सी. टिव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत व या सर्व कामांवर नगरअभियंता यांनी नियंत्रण ठेवावे असेही आयुक्त बांगर यांनी बैठकीत नमूद केले. उत्सव काळामध्ये नागरिक मोठ्या प्रमाणावर घराबाहेर पडतात, सर्वत्र आनंदाचे वातावरण असते, परंतु कोणाच्या कामकाजातील हलगर्जीपणामुळे उत्सवास गालबोट लागणार नाही याची सर्वांनी दक्षता घ्यावी, यासाठी सर्वांनी संयुक्तरित्या काम करावे अशा सूचनाही आयुक्तांनी या बैठकीत दिल्या.

### कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई

**गणेश आगमन मार्ग व विसर्जन मार्ग यावर कोणत्याही परिस्थितीत सार्वजनिक ठिकाणी घरगुती कचरा पडलेला दिसणार नाही याबाबत यंत्रणांनी सतर्क राहणे आवश्यक आहे. यासाठी स्वच्छता निरीक्षकाच्या माध्यमातून प्रमुख रस्त्यांवरील कचरा पडणारी ठिकाणे शोधून त्या ठिकाणी कचरा पडू नये यासाठी घरगुती कचरा संकलन बळकट करण्यासाठी आवश्यक व्यवस्था करावी तसेच त्यानंतरही सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणाऱ्या नागरिकांवर दंडात्मक कारवाई करावी.**

### साफसफाईबाबत स्वच्छता निरीक्षकांनी सजग रहावे

**संपूर्ण गणेशोत्सव काळात शहर स्वच्छ राहिल या दृष्टीकोनातून संबंधितांनी खबरदारी घ्यावी. सहाय्यक आयुक्त यांनी हजेरी शेडवर भेटी देवून साफसफाईच्या कामाचा आढावा घ्यावा. ज्या हजेरी शेड वर नियुक्त कर्मचाऱ्यांपेक्षा संख्या कमी असेल त्या कंत्राटदारावर कारवाई प्रस्तावित करावी. यांत्रिकी पध्दतीने रस्त्याची सफाई होईल याकडे लक्ष द्यावे. उत्सव कालावधीमध्ये यांत्रिकी पध्दतीने साफसफाई अधिक काळ करावी तसेच यांत्रिकी पध्दतीने साफसफाई करण्यासाठीच्या रस्त्यांची निवड विचारपूर्वक केली जावी असेही आयुक्त बांगर यांनी नमूद केले.**

## कोणत्याही आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण मिळावे काँग्रेसची भूमिका



### ठाण्यातील बंदला काँग्रेसचा जाहीर पाठिंबा

**ठाणे:** सातत्याने मराठा समाजाच्या आंदोलन वेगळे वळण घेत आहे सर्व स्तरातून त्याला पाठिंबा मिळत आहे. सोमवारी होणाऱ्या ठाणे बंद ला पाठिंबा देण्यासाठी रविवारी ठाण्यात पार पडलेल्या पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी बोलताना ठाणे काँग्रेस चे प्रवक्ते राहुल पिंगळे यांनी सांगितले. की सर्व जाती समाजांना पाठिंबा देण्यासाठी काँग्रेस कटिबध्द आहे.म्हणूनच ओबीसी आरक्षणासह कोणत्याही आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण द्यावे ही ठाणे काँग्रेसची भूमिका आहे. यावेळी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते राम भोसले यांनी मराठा समाजातील लोक आजही आर्थिक दृष्ट्या मागासलेले आहेत त्यामुळे मराठा समाजाकडे बघण्याचा दृष्टिकोन सरकारने बदलला पाहिजे असे सांगितले

उद्याच्या बंदला काँग्रेसने शांततेच्या मार्गाने पाठिंबा दिला आहे व पदाधिकाऱ्यांनी बंद मध्ये आहिंसक मार्गाने सहभागी होण्याबाबतच्या सूचनासह,ठाणेकर नागरिकांनीही बंदला पाठिंबा देण्याबाबत ठाणे काँग्रेसचे अध्यक्ष विक्रांत चव्हाण यांनी आवाहन केले असल्याची माहिती त्यांनी या प्रसंगी दिली.पत्रकार परिषदेस काँग्रेस चे ज्येष्ठ नेते राम भोसले, अनुसूचित जाती विभागाचे अध्यक्ष विजय बनसोडे,सांस्कृतिक विभाग अध्यक्ष स्वप्नील कोळी हजर होते.

## परिपूर्ण जिल्हा विकास आराखडा तयार करणार – जिल्हाधिकारी शिनगरे

**ठाणे :** देशाची तसेच राज्याची अर्थव्यवस्था ट्रिलियन डॉलर होण्यासाठी जिल्ह्यांचे योगदान त्यामध्ये महत्त्वाचे आहे. त्यामुळे जिल्ह्याचा विकास आराखडा तयार करण्यासाठी सर्व विभागांनी आपापल्या क्षेत्राची बलस्थाने, कमतरता, संधी यांचे विश्लेषण करून माहिती पाठवावी. जेणेकरून जिल्हा विकास आराखड्यात त्यांचा समावेश करून एक परिपूर्ण आराखडा शासनाला सादर करता येईल,असे निर्देश जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी दिले.

ठाणे जिल्ह्याची अर्थव्यवस्था सन २०२७-२८ पर्यंत दुप्पट करण्यासाठी जिल्हा विकास आराखड्यातील बाबी महत्त्वाच्या ठरणार आहेत.जिल्हा विकास आराखड्यात ग्रामीण भागाचे योगदानही महत्वाचे ठरणार आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या वतीने सामाजिक क्षेत्राच्या वाढीवर भर देण्यात येत असून महिला बचत गटांच्या माध्यमातून जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेला चालना देण्यात येत असल्याचे जिंदल यांनी यावेळी सांगितले.

दिशादर्शक, मार्गदर्शक!

दिवा न्यूज

सोमवार, दि. ११ सप्टेंबर २०२३



## मुंब्रा बायपास रोडवर सल्फ्युरिक ॲसिडचा टँकर उलटला

**ठाणे:** सल्फ्युरिक ॲसिड हे केमिकल घेऊन जाणारा टँकर मुंब्रा बायपास रोडच्या बाजूला असलेल्या नाल्यामध्ये उलटल्याची घटना नुकतीच घडली. हा अपघातात टँकरचालकाचा त्या टँकर वरील ताबा सुटल्याने झाला असून यामध्ये टँकर चालक ब्रिजेश सरोळ (४५) हे जखमी झाले आहे. या अपघाताने मुंब्रा– ठाणे रोडवरील वाहतूक धिम्या गतीने सुरू आहे. तर उलटलेल्या टँकरमधून केमिकलचा धूर व उग्र वास येत असल्याची माहिती ठाणे महापालिका आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

# ठाण्यात मूर्ती विसर्जनासाठी कृत्रिम तलावांची संख्या वाढवा



**ठाणे: महापालिका कार्यक्षेत्रात मूर्ती विसर्जनासाठी कृत्रिम तलाव प्रत्येक विभागात उपलब्ध केले जात असले तरी कृत्रिम तलावांची संख्या अत्यंत कमी आहे. यापुढील कृत्रिम तलाव हे खड्डा न खणता तयार करावेत, जेणेकरुन जागेचे नुकसान होणार नाही व संभाव्य अपघातही टाळू शकतो. नैसर्गिक स्त्रोत असलेल्या ठिकाणी गणेश विसर्जन करण्याऐवजी कृत्रिम तलावामध्ये घरगुती गणेशमूर्तीचे विसर्जन होणे हे प्राधान्याने अपेक्षित असते. शहरभर टप्प्याटप्प्याने कृत्रिम तलावांची संख्या वाढविल्यास नागरिकांना गणेश विसर्जनासाठी फार दूर जाण्याची गरज पडणार नसल्याचे आयुक्त अभिजित बांगर यांनी सांगितले.**

पर्यावरणपूरक गणेशउत्सवासाठी मोठया प्रमाणावर हातभार लागतो. मूर्ती विसर्जनासाठी होणारी गर्दी टाळण्याच्या उद्देशानेही कृत्रिम तलावांचे जाळे वाढवावे या दृष्टीने कार्यवाही करण्यासाठी संबंधित विभागाला यापूर्वीच सूचना दिल्या आहेत. गणेशमूर्तीचे पहिले विसर्जन दीड दिवसांनी केले जात असल्यामुळे गणेशचतुर्थीच्या दिवशीच सर्व कृत्रिम तलाव कार्यरत असतील याची खात्री करुन घ्यावी असेही आयुक्तांनी नमूद केले. तसेच कृत्रिम तलावांचे काम झाल्यानंतर त्या ठिकाणी सुरक्षेच्या दृष्टीने पूर्णवेळ कृत्रिम तलावात पाण्याचा साठा असल्यामुळे पाण्यात कोणी पडून दुर्घटना घडू नये यासाठी सुरक्षा रक्षक नेमावेत. असेही म्हटले आहे.

### झाडांच्या फांद्याची छाटणी करावी

**ज्या मार्गावरुन गणेशमूर्तीची ने–आण केली जाणार आहे अशा ठिकाणी झाडांच्या फांद्यामुळे अडथळा निर्माण होत असेल त्या ठिकाणच्या झाडांच्या फांद्याची छाटणी करण्यात यावी. काही ठिकाणी विद्युत ओव्हरहेड केबल्स लोंबकळत असल्याचे दिसून याबाबत महापालिका विद्युत विभाग व एमएसईबी विभागाने संयुक्तरित्या पाहणी करुन सदर ओव्हरहेड वायरबाबत उपाययोजना कराव्यात.**

## आता ठामपा कर्मचाऱ्यांना करता येणार सात ठिकाणी इलेक्ट्रीक वाहनांची मोफत चार्जिंग

**ठाणे :** ठाणे महापालिकेच्या कर्मचाऱ्यांसाठी एक गोड बातमी आहे. इलेक्ट्रीक दुचाकी आणि चारचाकी वाहन असलेल्या कर्मचाऱ्यांना येत्या डिसेंबर महिन्यात सुरू होणाऱ्या शहरातील सात चार्जिंग सेंटर वर मोफत वाहन चार्जिंग करण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. हे सेंटर महापालिका माझी वसुंधरा मोहीमेअंतर्गत उभारण्यात येणार आहेत. प्रामुख्याने महापालिका मुख्यालयासह वर्तकनगर, नितिन फायर स्टेशन, माजिवडा मानपाडा प्रभाग समिती या ठिकाणी सात चार्जिंग सेंटर असणार आहेत. दरम्यान, हा उपक्रम महापालिकेने इलेक्ट्रीक वाहनांना प्रोत्साहन देण्यासाठी आपल्यापासूनच सुरवात करणार आहे. त्यामुळे निश्चितच याचा फायदा पालिका कर्मचाऱ्यांना होणार असून ते देखील इलेक्ट्रीक वाहन खरेदी करण्याकडे कल वाढले असा विश्वास पालिकेला वाटत आहे.

ठाणे महापालिकेच्या माध्यमातून शहराच्या विविध भागात पहिल्या टप्यात १० ठिकाणी इलेक्ट्रीक वाहनांसाठी चार्जीग स्टेशन उभारणार आहे. त्याअनुषंगाने कामही सुरु झाले आहे. परंतु ठाणेकरांचा कल इलेक्ट्रीक वाहनांकडे झुकण्यासाठी महापालिका आता या मोहीमेची स्वत:पासून सुरवात करणार आहे. त्या अनुषंगाने माझी वसुंधरा मोहीमे अंतर्गत महापालिकेने हे पाऊल उचलले आहे. यातून पालिका कर्मचाऱ्यांना इलेक्ट्रीक वाहने घेण्यासाठी प्रोत्साहन केले जाणार आहे.

सध्या पेट्रोल आणि डिझेलचे भाव गगनाला भिडले आहेत. त्यातही यातून होणाऱ्या प्रदुषणामुळे पर्यावरणाची देखील हानी होत आहे. त्यामुळे पर्यावरणाची हानी टाळण्याबरोबर पेट्रोल, डिझेलवर होणाऱ्या खर्चाला देखील या माध्यमातून आळा बसेल असा विश्वास पालिकेला वाटत आहे. आज महापालिकेतील कर्मचाऱ्यांकडे पेट्रोलवरील दुचाकी आहेत. परंतु त्यांनी इलेक्ट्रीक वाहन घेतल्यास त्यांचा पेट्रोलवरील खर्च देखील यामुळे वाचणार आहे. महापालिका यासाठी मोफत चार्जींग उपलब्ध करुन देणार आहे.

त्यानुसार पहिल्या टप्यात ठाणे महापालिका मुख्यालय – १० किलो व्हॅटचे १ आणि २२ किलो व्हॅटचे १ चार्जिंग सेंटर तर वर्तकनगर – १० किलो १ आणि ३० किलो १ तसेच माजिवडा मानपाडा प्रभाग समिती येथे १० किलो १ याशिवाय नितीन फायर स्टेशन येथे १० किलो १ आणि २२ किलो १ असे सात चार्जीग स्टेशन उभारले जाणार आहेत. त्यात काही स्लो तर काही फास्ट चार्जीगचे स्टेशनचा समावेश असणार आहे. यासाठी १९ लाखांचा खर्च अपेक्षित धरण्यात आला आहे. त्यानुसार त्याची निविदा देखील काढण्यात आली असल्याची माहिती महापालिकेच्या विद्युत विभागाने दिली.

## नव्या १० इलेक्ट्रीक बसेसने घोडबंदरवरील गारेगार सेवेत वाढ

**ठाणे :** ठाणे परिवहनच्या ताफ्यात दाखल झालेल्या इलेक्ट्रिक १० नव्या बसेस शनिवारपासून ठाणेकर नागरिकांसाठी रस्त्यावर धावण्यास सुरुवात झाली आहे. यामुळे घोडबंदर बोरीवली या मार्गावरील प्रवाशांना गारेगार प्रवास करता येणार आहे. यापूर्वी ही १३ इलेक्ट्रिक बसेस तसेच आताच्या १० इलेक्ट्रिक बसेसने ही २३ झाली असून या दहा बसेस कोणत्याही प्रकारचे औपचारीक उद्घाटन न करता त्या ठाणेकरांच्या सेवेत रुजु करण्यात आल्याची माहिती ठामपा परिवहन सेवेने दिली.

केंद्र शासनाच्या राष्ट्रीय स्वच्छ हवा उपक्रमांतर्गत १२३ पर्यावरणपुरक इलेक्ट्रीक बस खरेदी करण्यात आल्या आहेत. त्यापैकी केवळ १३ बस टिएमटीच्या ताफ्यात यापुर्वीच दाखल झाल्या आहेत. जून २०२३ महिनाअखरेपर्यंत सर्व बस परिवहनच्या ताफ्यात दाखल होणे अपेक्षित होते. परंतु ठेकेदाराकडून या मुदतीत बस उपलब्ध होऊ शकलेल्या नसून याप्रकरणी टिएमटी प्रशासनाने ठेकेदारावर दंडात्मक कारवाई केली आहे. या नंतर आता ठेकेदाराकडून बस उपलब्ध होऊ लागल्या असून ठेकेदाराने दहा बस टिएमटीला उपलब्ध करून दिल्या आहेत. यामुळे टिएमटीच्या ताफ्यात इलेक्ट्रीक बसची संख्या आता २३ झाली आहे. उर्वरित शंभर बस ऑक्टोबर महिनाअखेरपर्यंत दाखल होण्याची शक्यता आहे. नव्याने दाखल झालेल्या १० बस १२ मीटर लांबीच्या आहेत. त्यात ४० प्रवासी बसतील एवढी क्षमता आहे. त्यानुसार शनिवार पासून या बस घोडबंदर बोरीवली मार्गावर सुरु करण्यात आल्या आहेत. याशिवाय ठाणे ते खिडकाळी या मार्गावर देखील ही बस सुरु करण्यात आल्याचे परिवहनने स्पष्ट केले.

येत्या काही दिवसात आणखी १६ नवीन इलेक्ट्रीक बस परिवहन सेवेत दाखल होणार आहेत. त्यामुळे ठाणेकरांना आणखी चांगली सेवा मिळणार आहे. त्यातही आता प्रथमच ठाणे ते भिवंडी या मार्गावर देखील येत्या दोन ते तीन दिवसात २ इलेक्ट्रीक सुरु केल्या जाणार असल्याची माहिती देण्यात आली.

**नौपाड्यातील आगीत ४ मीटर बॉक्स जळून खाक**



**ठाणे:** नौपाडा,गोखले रोड येथील मंजुळा आर्केड या तळ अधिक ०३ मजली इमारतीच्या तळ मजल्यावरील मीटर रूम मध्ये आग लागल्याची घटना शुक्रवारी पहाटे ५ वाजण्याच्या सुमारास समोर आली. ही आग २० मिनिटात नियंत्रणात आणण्यात यश आले असले तरी यामध्ये ०४ मीटर बॉक्सला आग जळून खाक झाले आहेत. तसेच या घटनेत कोणालाही दुखापत झालेली नाही. या आगीची माहिती मिळताच घटनास्थळी महावितरण कंपनीचे कर्मचारी, अग्निशमन दलाचे जवान तसेच आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी यांनी धाव घेतली.




**माजी नगरसेवक शैलेश पाटील यांच्या माध्यमातून दिवा विकास प्रतिष्ठान ची मानाची हंडी.**

## पंतप्रधान मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त धावणार गणपती स्पेशल 'मोदी एक्सप्रेस'

**ठाणे** : आ. नितेश राणे यांनी पंतप्रधान मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त मुंबईस्थित कणकवली विधानसभा मतदारसंघातील चाकरमानी गणेशभक्तांसाठी खुशखबर दिली असून गणेशचतुर्थीसाठी स्पेशल मोदी एक्सप्रेसची मोफत सोय उपलब्ध केली आहे. १७ सप्टेंबर रोजी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस आहे. वाढदिवसाचे औचित्य साधून 'मोदी एक्सप्रेस' याच दिवशी सोडून तिला स्पेशल बनवण्यात येत आहे. १७ सप्टेंबर रोजी दुपारी १२:३० वा. ही गाडी दादरच्या ८ नंबर प्लॅटफॉर्म वरून सोडण्यात येणार आहे. प्रवासादरम्यान प्रवास करणाऱ्या कोकणवासीयांची जेवण आणि पाण्याची सोय करण्यात आली असल्याचेही त्यांनी सांगितले आहे.

## १२ सप्टेंबरला शिवसेनेतर्फे आरोग्य शिबिराचे आयोजन

**दिवा:**–धर्मवीर आनंद दिघे हृदयरोग उपचार केंद्र छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय कळवा व मातोश्री गंगुबाई संभाजी शिंदे हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने शिवसेनेच्या वतीने मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन दिवा तिसाई नगर येथे करण्यात आले आहे.





दर्शना चरण दास म्हात्रे आणि विनोद मढवी यांच्या वाढदिवसानिमित्त या भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

मंगळवारी १२ सप्टेंबर रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत तिसाई नगर येथील शिवसेना जनसंपर्क कार्यालयात या शिबिराचे आयोजन केले आहे. या शिबिरात अँजिओग्राफी अँजिओप्लास्टी यासह हृदयासंबंधीत आजारावर सर्जरी, किडनी संदर्भातील आजार व अन्य आजारांचार निदान तसेच उपचार केले जाणार आहेत.या शिबिराचा लाभ गरजू नागरिकांनी घ्यावा असे आयोजकांनी केले आहे.

# समाजसेवक अशोक सोलंकी यांनी दिव्यातील गुजराती लोकांचा सण सातम–आठम केला साजरा





**दिवा:**– गुजराती समाजाचे सण शीतला सातम हे देवी शीतला आईची पूजा करून साजरा केला जातो. श्रावण वद सप्तमीच्या दिवशी हे सण साजरे केले जातात. त्या दिवशी देवी ला नैवेद्य साठीव शिळे पदार्थ लागतात, म्हणून गुजराती नागरिक अगोदरच्या दिवशी जेवण बनवतात व रात्री जेवण बनवून झाल्या वर चुलीला पूर्णपणे थंड करून, त्याची पूजा करतात. दुसऱ्या दिवशी हे थंड जेवण देवी शीतला आईला नैवेद्य दिला जातो अशी माहिती अशोक सोलंकी यांनी दिली.

यावर्षीही हा उत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाला. अशोक सोलंकी यांनी भाविकांना शितलादेवीचे दर्शन घेता यावे यासाठी देवीची प्रतिष्ठापना केली होती.यावेळी भाजपा दिवा शहर मंडळ अध्यक्ष रोहिदास मुंडे, महासचिव युवराज यादव, गुजराती सेल अध्यक्ष अशोक सोलंकी, उ.भा. मोर्चा अध्यक्ष अजय सिंग, वॉर्ड अध्यक्ष नागेश पवार व गुजराती सेल पदाधिकारी, मिनु गोहिल, संजय गोहिल, विनुबेन पडाया, किसन वालेरा, कल्पेश सोलंकी, जिनल सोलंकी, किरण सोलंकी, कांता वालेरा, बिल्डिंगचे अध्यक्ष श्री सदानंद घाडी, साळवी व बालिका दिशा वालेरा ही ने कृष्णाच्या वेशभूषेत सर्वांना मंत्र मुग्ध केले आणि अन्य गुजराती कार्यकर्ते पण उपस्थित होते.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. ११ सप्टेंबर २०२३


www.diwanews.com

## मुंब्रात एकाच इमारतीत पकडल्या ४३ घरात वीजचोरी

**ठाणे:** टोरंट पॉवरच्या दक्षता पथकाने घातलेल्या धाडीत मुंब्रा अमृत नगर येथील एका इमारतीत वीज चोरीच्या ४३ केसेस पकडल्या असून या प्रकरणी ८ जणांविरूध्द मुंब्रा पोलीस ठाण्यात वीज चोरीचा गुन्हा दाखल झाला आहे. अमृत नगर येथील 'बाग ए ख्वाजा' या इमारतीत ही वीज चोरी पकडण्यात आली असून तळमजला ते सहा मजल्यांची ही इमारत आहे. येथील ४३ घरांमध्ये ८ जणांच्या नावाने वीज मीटर दाखवण्यात आले होते. मुंब्रा पोलीस ठाण्यात वीजचोरीचा गुन्हा नोंदवण्यात आला. एकूण १५ लाख ९३ हजाराची वीजचोरी झाली झाले.



# ठाणेकरांचा गोकुळ हंडीला उत्स्फूर्त प्रतिसाद

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची हजेरी




**ठाणे:-** यंदा ठाण्यात प्रथमच ठाणेकरांनी गोकुळहंडीचा थरार अनुभवला. भाजपचे माजी नगरसेवक कृष्णा पाटील यांनी गोकुळ नगर येथे गोकुळ हंडी आयोजित केली होती. या हंडीला राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती लाभली. गोविंदा पथकांनी मोठ्या प्रमाणात या दहीहंडीला हजेरी लावून सलामी दिली. या दहीहंडीत एकूण ५१ लाखांच्या बक्षिसाचे वाटप करण्यात आले.त्याचबरोबर दिवसभर गोविंदा व नागरिकांसाठी मोफत भोजनाची व्यवस्था या दहीहंडीत करण्यात आली होती. या दहीहंडीमध्ये अर्जुन पुरस्कार विजेत्या खेळाडूंचा सन्मान करण्यात आला.नागरिकांनी गोकुळ हंडीला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.













## मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी मिळविणे झाले सोपे

**मुंबई :** मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाने आपल्या सातत्यपूर्ण कामगिरीचा आलेख कायम राखत अवघ्या १४ महिन्यात १३ हजाराहून अधिक गोरगरीब –गरजू रुग्णांना एकूण ११२ कोटी १२ लाख रुपयांची आर्थिक मदत वितरित केली आहे. आता मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी मिळविणे आणखी सोपे झाले असून यासाठी मंत्रालयात येण्याची आवश्यकता भासणार नाही. सीएमएमआरएफ या ॲप्लिकेशनवर अर्ज भरुन मदत मिळविता येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री सहाय्यता कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे यांनी दिली आहे. मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीमध्ये अनेक–विविध आजारांचा समावेश देखील करण्यात आला आहे. यामध्ये अँजिओप्लास्टी, बायपास सर्जरी, कर्करोगावरील शस्त्रक्रिया, केमोथेरपी, डायलिसिस, जन्मतः मूकबधिर लहान मुलांच्यासाठी अत्यावश्यक असणारी कॉकलीयर इनप्लांट शस्त्रक्रिया, सर्व प्रकारचे अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, रस्ते अपघात, विद्युत अपघात, भाजलेले रुग्ण, जन्मतः लहान मुलांच्या हृदयशस्त्रक्रिया आदींचा समावेश आहे.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. ११ सप्टेंबर २०२३

www.diwanews.com

### एसटी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्यात होणार ४% वाढ

**मुंबई :** गणेशोत्सवानिमित्त मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एसटी कर्मचाऱ्यांसाठी आनंदाची बातमी दिली आहे. राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे एसटी कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता ३४ टक्क्यांवरुन ३८ टक्के करण्याच्या प्रस्तावावर आज मुख्यमंत्र्यांनी मान्यता दिली. सध्या राज्य परिवहन महामंडळाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना वेतनासाठी शासनाकडून अर्थसहाय देण्यात येते. त्यामुळे महागाई भत्यामध्ये ४ टक्क्यांची वाढ झाल्याने सरकारवर ९ कोटी रुपयांचा बोजा पडेल. त्याचप्रमाणे असुधारित वेतन संरचनेतील राज्य परिवहन कर्मचाऱ्यांना २१२ टक्के महागाई भत्ता देण्यात येईल.

# अर्चना पाटील आयोजित मंगलागौर स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद









दिवा शिवसेना महिला आघाडी व अर्चना निलेश पाटील यांच्या वतीने आकांक्षा हॉल येथे राज्यस्तरीय मंगळागौर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेना नेत्या माजी महापौर मीनाक्षी शिंदे या उपस्थित होत्या.

या स्पर्धेला शहरातील महिलांनी मोठ्या संख्येने प्रतिसाद देत स्पर्धेत सहभाग घेतला.अतिशय उत्साहाच्या वातावरणात सदर मंगलागौर स्पर्धा पार पडली.महिलांना त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याबद्दल महिलांनी अर्चना पाटील यांचे आभार मानले. स्पर्धेला मोठ्या संख्येने प्रतिसाद दिल्याबद्दल आयोजक अर्चना निलेश पाटील यांनी सर्व स्पर्धक महिला व प्रेक्षक महिलांचे आभार मानले.










